भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2016 ◑ Y 724290

26 SEP 2016

अनु.क्र. 34061 दि. ........ मु.शु.रक्कम 500/-

दस्ताचा प्रकार L&L

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव नासीम इमाम सौदागर

पत्ता वानवडी पुणे - ४११०४६

दुसऱ्या पक्षकाराचे नांव किलबील एज्युकेशन सो.सा.

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता प्रवीण मदन

संजय रंगनाथ चौधरी
परवाना क्र २२०५११४
१८४, कसबा पेठ, पुणे

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

सहाय्यक कोषागार अधिकारी
पुणे

20 SEP 2016

प्रथम मुद्रांक लिपीक
कोषागार पुणे करिता

NOTARY
RAVSAHEB KAILAS KENDALE
HAVELI PUNE
Regd. No. [illegible]5907
Exp. Dt. 12/12/2024
GOVERNMENT OF INDIA

NOTARY
A. M. MANE
PUNE
MAHARASHTRA
REGD. NO. 2919
Exp. Dt. 22/04/2028
GOVERNMENT OF INDIA

लिव्ह ॲन्ड लायसेन्स करारनामा

लिव्ह ॲन्ड लायसेन्स करारनामा आज दि.१८ आक्टोबर सन २०१६ इसवी ते दिवशी

श्री - नासिर इमाम सौदागर
वय : ४४ वर्षे.
धंदा : नोकरी
पत्ता : जनवाडी पुणे ४११०१६

करारनामा
लिहून घेणार

यांसी

यात यापुढे लिहून घेणार असे संबोधण्यात आले असुन या संज्ञेत त्याचा संदर्भ किंवा अर्थ प्रतिकुल नसेल तर, त्याचे वारसदार, निष्पादक, प्रशासन ,अभिहस्तांकती असा आहे व त्यात त्यांचा समावशे होतो -

किलबिल एज्युकेशन सोसायटी
सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट १९५०
अन्वये नोंदणीकृत ,२४६ जनवाडी, पुणे ४११०१६
तर्फे चेअरमन
श्री - रफीक इमाम सौदागर
वय : ५४ वर्षे
धंदा : नोकरी

करारनामा
लिहून देणार

यात यापुढे लिहून देणार असे संबोधण्यात आले असुन या संज्ञेत त्याचा संदर्भ किंवा अर्थ प्रतिकुल नसेल तर, त्याचे वारसदार, निष्पादक, प्रशासन ,अभिहस्तांकती असा आहे व त्यात त्यांचा समावशे होतो -

कारणे लिव्ह ॲन्ड लायसेन्स करारनामा लिहून देतो की

१) मिळकतीचे वर्णन : तुकडी पुणे, पोट तुकडी , ता हवेली, जि पुणे मे - सब रजिस्ट्रार साहेब हवेली पुणे त्यांचे हद्दीतील मौजे पिंपळे गुरव सर्व्हे नं ७७/१/१ प्रभातनगर पुणे ६१ एकुण क्षेत्रफळ अंदाजे ४३८० चौ - फूट येणे प्रमाणे मिळकत प्रस्तुत या लिव्ह ॲन्ड लायसेन्स करारनाम्याचा विषय मिळकत असुन यापुढे त्यास सदर मिळकत असे संबोधण्यात आले आहे -

२) सदर मिळकत लिहून घेणार यांच्या मालकी हक्काची असुन सदर मिळकत लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्तवावर देण्याचा लिहून घेणार यांना हक्क व आधिकार आहे - लिहून देणार ही शैक्षणीक संस्था असुन सदर मिळकत लिहून देणार या संस्थेला शाळेकरीता आवश्यक होती - सबब लिहून देणार यांनी लिहून घेणार यांची भेट घेतली आणी शैक्षणीक संस्था व

तिची शाळा संध्या शाळेचे नाव किलबिल प्रायमरी & सेंकडरी स्कुल असे आहे . इत्यादीकरिता सदर मिळकत लिव्ह ॲन्ड लायसेन्स ५ वर्षाच्या कालावधीसाठी देण्याची विनंती केली . लिहून देणार यांनी लिहून घेणार त्याबाबत चर्चा आणी वाटाघाटी होऊन लिहून घेणार यांनी सदर मिळकत लिहून देणार यांना लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्तवावर द्यावयाचे खालील अटी व शर्तीवर मान्य व कबुल केले आहे .

३) सदर लिव्ह ॲन्ड लायसेन्स कराराचा कालावधी दिनांक ०१ / ०६ / २०१६ ते दिनांक ३१ / ०५ / २०२१ असा राहिल .

४) लिहून देणार यांनी एका महिन्याचे आगाऊ भाडे डिपॅाझीट म्हणुन देण्यात आले असुन लिव्ह ॲन्ड लायसेन्स करारनामा संपुष्टात आल्यावर लिहून घेणार यांनी सदर रक्कम लिहून देणार यांना परत करावयाची आहे .

५) सदर मिळकतीची ॲडव्हान्स लायसेन्स फी म्हणुन लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आतरूपये १६०००/- (सोळा हजार रूपये) चा भरणा करावयाचा आहे . सदर लायसेन्स फी मध्ये प्रतिवर्षी १५ % वाढ होई . उक्त नमूद लायसेन्स फीच्या रकमेवरील टीडीएस सटीफिकेट लिहून देणार हे लिहून घेणार यास देतील . सदर मिळकतीबाबतचे वीज बिल . पाणी पट्टी अन्न टॅाक्स देखभाल खर्च तसेच फोन बिल लिहून देणार यानी भरावयाची आहेत . मिळकत कर लिहून घेणार भरतील .

६) लिहून देणार यांचा नामफलक / जाहीरात बोर्ड लावण्यास लिहून घेणार याची संमती असुन त्यासाठी आवश्यक ती परवानगी लिहून देणार यांनी घ्यावयाची आहे त्यासाठी आवश्यक सल्ला समस्या लिहून घेणार देऊतील .

७) सदर जमीन मिळकतीचा वापर पटांगण म्हणुन शैक्षणिक तसेच संस्थेचे अथवा संस्थेने प्रायोजित केलेले कार्यक्रम करण्याकरता तसेचे अन्य आवश्यक आणि अनुषंगीक वापर करण्याची लिहून घेणार यांस मुभा / परवानगी आहे .

८) सदर मिळकतीमध्ये लिहून देणार यांच्या व्यावसायाच्या दृष्टीने आवश्यक फर्निचरआणि फिक्चर तसेच अन्य सोयी सुविधा करन्यास लिहून घेणार यांची हरकत नाही .

९) सदर मिळकतीमध्ये आगाऊ सुचना देऊन प्रवेश करण्याचा व तपासणी करण्याचा अधिकार लिहून घेणार याचे प्रतिनिधी यांना आहे .

१०) लिहून देणार यांनी यांना करावयाच्या शैक्षणिक संस्थेबाबत आवश्यक त्या सर्व रितसर परवानग्या घेणे आवश्यक आहे . त्याच प्रमाणे कायदयातील तरतुदीनुसार व्यवसायाबाबत लागणारे इतर आवश्यक ते परवाने घ्यावयाचे आहेत . त्याची कोणतीही कायदेशीर वा आर्थिक जबाबदारी लिहून घेणार यांची नाही .

११) लिहून देणार सदर मिळकतीमध्ये कोणत्याही बेकायदेशीर तसेच ज्वलनशील धोकादायक वस्तूची साठवणुक विकी करणार नाहीत . सदर मिळकतीमधील लिहून देणार यांच्या वस्तु माल तसेच इत्यादी साहित्याच्या नुकसानीस चोरीस तसेच सदर मिळकतीमध्ये लिहून देणार वा त्यांचेकडे काम करणाऱ्यास कोणताही इजा झाल्यास त्याची कोणतीही जबाबदारी लिहून घेणार यांची नसेल .

१२) लिहून देणार यांनी लायसेन्स फी वेळेवर न भरल्यास लिहून घेणार हे लिहून देणार यांस ३० दिवस मुदतीची नोटीस पाठवतील . सदर ३० दिवसांमध्ये लिहून देणार यांनी लायसेन्स फी न भरल्यास प्रस्तुत लिव्ह ॲन्ड लायसेन्स करारनामा संपुष्टात येईल .

१३) प्रथम ११ महिन्यांचा कालावधी लॉक इन पिरियड आहे . सदर कालावधी लिहून देणार यांनी स्पष्टपणे मान्य केला आहे . प्रस्तुत लिव्ह ॲन्ड लायसेन्स करारनामा संपुष्टात आणावयाचा झाल्यास तशी ३ महिन्यांची लेखी नोटीस देण्यात येईल आणि नोटीसीचा कालावधी अंती लिहून देणार सदर मिळकतीचा खुला व प्रत्यक्ष ताबा त्यांचे सामान काढुन घेऊन लिहून घेणार यांस परत करतील .

१४) प्रस्तुत लिव्ह ॲन्ड लायसेन्स करारनामाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर सदर कालावधी अंती लिहून देणार सदर मिळकत आणखी पाच वर्षाकरिता लिव्ह अॅन्ड लायसेन्सवर घेऊ शकतील व त्याकरिता स्वतंत्र लिव्ह ॲन्ड लायसेन्सचा दस्त लिहुन व नोंदवुन ठेवण्यात येईल . अशाप्रकारे वेळोवेळी पाच वेळा मुदत वाढवुन घ्यावयाची असल्यास प्रत्येक वेळी स्वतंत्र लिव्ह ॲन्ड लायसेन्सचा दस्त लिहुन व नोंदवुन ठेवण्यात येईल . अशाप्रकारे एकुन ५ (एकुण २५ वर्षे )वेळा मुदत वाढवुन घेण्याचा हक्क लिहून देणार यांस राहिल व प्रत्येक वेळी नविन दस्त त्या त्या वेळी लागु असलेल्या कायद्यान्वये नोदविण्यात येईल जेणेकरून सदर मिळकत लिहून देणार एकुन ३० वर्षाच्या कालावधी करिता प्रस्तुत कराराची मुदत धरून वापरू शकतील प्रस्तुत मुदतीच्या अंती जी लायसेन्सी फी असेल त्यामध्ये कराराच्या वाढीव कालावधीमध्ये प्रतीवर्षी १५% वाढ होईल .

१५) प्रस्तुत करारनाम्यान्वेय लिहून देणार आणि लिहून घेणार यांचेमध्ये घर मालक भाडेकरु असे नाते निर्माण झालेले नाहीत . लिहून देणार हे सदर मिळकतीचे भाडेकरू नाहीत व तसा दावाही ते करणार नाहीत .

१६) प्रस्तुत करारनाम्याचा आवश्यक खर्च लिहून देणार यांनी केला आहे .

सबब येणेप्रमाणे प्रस्तुतचा लिव्ह ॲन्ड लायसेन्स करारनामा लिहून देणार यांनी त्याचे मर्जीने राजखुशीने व अक्कलहुषारीने समजुन उमजुन लिहून दिला असुन प्रस्तुत लिव्ह ॲन्ड लायसेन्स करारनामा लिहून देणार यांचेवर बंधनकारक आहे व राहील याकरीता लिहून देणार व लिहून घेणार यांनी आज रोजी प्रस्तुत लिव्ह ॲन्ड लायसेन्स करारनाम्यावर खालील दोन साक्षीदारांसमक्ष वर नमूद दिवशी सह्या केल्या असे .



साक्षीदार
सही
नाव
पत्ता

लिहून घेणार
श्री .नासिर इमाम सौदागर



साक्षीदार
सही
नाव
पत्ता

लिहून देणार
चेअरमन ः किलबिल एज्युकेशन सोसायटी

BEFORE ME

A. M. MANE
NOTARY, GOVT. OF INDIA
PUNE
REGN. NO. 2919

19 OCT 2016

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

TRUE COPY

RAVSAHEB KAILAS KENDALE
ADVOCATE & NOTARY
GOVT. OF INDIA